आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२२ जून २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विविध क्षेत्रातल्या सहकार्यासाठी भारत आणि बांग्लादेश यांच्यात सामंजस्य करार, वैद्यकीय उपचारासाठी बांग्लादेशी नागरिकांना ई-विसा देण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घोषणा

- बनावट बिलांच्या आधारे इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करण्याचे प्रकार रोखण्यासाठी आधारसंलग्न बायोमेट्रीक आधारित यंत्रणा राबवण्याचा जीएसटी परिषदेचा निर्णय

- स्पर्धा परीक्षांमधल्या गैरप्रकारांबद्दल १० वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करणारा कायदा आजपासून लागू

- इमिग्रेशन प्रक्रिया वेगवान होण्यासाठी दिल्ली विमानतळावर नव्या सुविधेचं लोकार्पण, लवकरच मुंबईसह इतरही ठिकाणी होणार सुरुवात

**आणि**

- टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताविरुद्धच्या सामन्यात बांग्लादेशचा नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय

**<><><><><>**

भारत – बांग्ला देश दरम्यान आज विविध क्षेत्रातले महत्त्वाचे सामंजस्य करार झाले. यात पर्यावरणस्नेही उपक्रम, सागरी व्यापार, रेल्वे दळणवळण, आरोग्य आणि वैद्यक, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रांचा समावेश होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बांग्ला देशच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांच्याबरोबर आज नवी दिल्लीत हैद्राबाद हाऊस इथं द्विपक्षीय चर्चा केली. त्यानंतर ह्या करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

बांग्ला देशी नागरिकांना भारतात वैद्यकीय उपचारांसाठी ई- व्हिसा दिला जाईल, तसंच बांग्ला देशात रंगपूर इथं नवीन सहाय्यक दूतावास सुरु केला जाईल, अशी घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली.

बांग्ला देशाप्रति, शेजारधर्म, पूर्वगामी धोरण, सागरी व्यापार धोरण व्हिजन सागर आणि हिंद- प्रशांत महासागर क्षेत्रातलं धोरण अशा विविध पातळ्यांवर भारताचे दृढ संबंध आहेत, असं प्रधानमंत्री मोदी यांनी या चर्चेनंतर दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. भारत हा बांग्ला देशचा विश्वासू मित्र असल्याची भावना बांग्ला देशच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांनी आपल्या निवेदनात व्यक्त केली, तसंच प्रधानमंत्री मोदी यांना बांग्ला देशात येण्याचं निमंत्रण दिलं.

यानंतर शेख हसीना यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली.

<><><><><>

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या सोमवारपासून, म्हणजेच २४ जूनपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात हंगामी सभापती भर्तृहरी मेहताब नवनिर्वाचित खासदारांना शपथ देतील. लोकसभेच्या नव्या सभापतीपदाची निवडणूक २६ जून रोजी होईल, तर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू २७ जूनला संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर अभिभाषण करतील. राज्यसभेचं अधिवेशन २७ जूनपासून सुरू होणार आहे. हे अधिवेशन ३ जुलै रोजी संपेल.

<><><><><>

राज्यांना दिला जाणारा करांचा हिस्सा, वित्त आयोग अनुदान आणि वस्तू आणि सेवा कर भरपाई थकबाकीच्या माध्यमातून  केंद्राकडून राज्यांना मिळणारं सहाय्य राज्यांमध्ये विकासाला गती देण्याच्या उद्देशाने प्रेरित असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज अर्थसंकल्पाच्या

पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत आयोजित सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांच्या बैठकीत बोलत होत्या. राज्यांमध्ये भांडवली गुंतवणुकीत वाढ होण्यासाठी विशेष सहाय्यता योजनांचा लाभ घेण्याचं आवाहन त्यांनी सर्व राज्यांना यावेळी केलं.

**<><><><>**

बनावट बिलांच्या आधारे इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करणारे प्रकार रोखण्यासाठी आधारसंलग्न बायोमेट्रीक आधारित यंत्रणा जीएसटीमध्ये राबवली जाणार आहे. वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ५३ व्या  बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. गुजरात, पुद्दुचेरीमध्ये याची चाचणी झाली असून टप्प्याटप्प्याने देशभरात अंमलबजावणी होईल, असं त्या म्हणाल्या. रेल्वेचं प्लॅटफॉर्म तिकीट, प्रतीक्षा कक्ष यासारख्या सुविधांना जीएसटीतून वगळल्याचंही त्या म्हणाल्या.

**<><><><>**

विविध स्पर्धा परीक्षांमधल्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारनं कठोर कायदा केला आहे. दोषींना १० वर्षे पर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. या तरतुदी आजपासून लागू होत असल्याचं राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत म्हटलं  आहे. 'सार्वजनिक परीक्षांमधील अयोग्य माध्यमांचा प्रतिबंध विधेयक, २०२४' लोकसभेने ६ फेब्रुवारीला तर राज्यसभेने ९ फेब्रुवारी रोजी मंजूर केलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी १२ फेब्रुवारी रोजी विधेयकावर स्वाक्षरी केली. केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, नॅशनल टेस्टिंग एजन्सी NTA, रेल्वे भरती आणि बँकिंग भरती परीक्षा अशा विविध सार्वजनिक परीक्षांमध्ये होणार्या  अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी हा

कायदा आहे. फसवणुकीबद्दल किमान तीन ते पाच वर्षांचा तुरुंगवास आणि फसवणुकीच्या संघटित गुन्ह्यामध्ये सहभागाबद्दल ५ ते १० वर्षांचा तुरुंगवास आणि किमान एक कोटी रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

<><><><><>

एन टी ए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या परीक्षा पारदर्शी, सहज आणि योग्य वातावरणात पार पडाव्यात यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं उच्चस्तरीय तज्ञ समितीची स्थापना केली आहे. इसरोचे माजी अध्यक्ष डॉक्टर के राधाकृष्णन या सात सदस्यीय समितीचे अध्यक्ष असतील. कार्यक्षमता वाढवून एन टी ए च्या चुकीच्या पद्धती मोडून काढत परीक्षा प्रक्रियेत सुधारणा, संकलित माहिती सुरक्षा तसंच संस्थेची रचना आणि कामकाज याची समीक्षा समिती करणार आहे.

<><><><><>

व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा पारदर्शक असून विद्यार्थी आणि पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केलं. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षानं औषध निर्माणशास्त्र आणि कृषी शिक्षण अभ्यासक्रमासाठी परीक्षा घेतली होती. यात समान गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना वेगवेगळे पर्सेंटाईल दाखवल्याचा आक्षेप चुकीचा असल्याचं सरदेसाई यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय विमान प्रवासात इमिग्रेशन प्रक्रिया वेगानं व्हावी यासाठी केंद्र सरकारनं FTI-TTP अर्थात फास्टट्रॅक इमिग्रेशन ट्रस्टेड ट्रॅव्हलर प्रोग्रॅम नावाची

विशेष योजना सुरू केली आहे. या योजनेचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते दिल्ली विमानतळावर झालं. याचा लाभ भारतीय नागरिक आणि अनिवासी भारतीयांना होईल. यामुळे भारतीय आणि अनिवासी भारतीय नागरिक यांचा विमान प्रवास अधिक वेगवान, सुरळीत आणि सुरक्षित होईल, असा विश्वास यावेळी शहा यांनी व्यक्त केला आहे. योजनेसाठी पात्र असलेल्या नागरिकांना ऑनलाईन अर्ज दाखल करून आवश्यक तपशिलांची नोंद करावी लागेल. त्यानंतर त्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. देशातल्या 21 विमानतळावरही ही योजना सुरू होणार असून त्यात मुंबई, चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू, हैदराबाद, कोची आणि अहमदाबाद या विमानतळांचा समावेश आहे.

**<><><><><>**

मराठा आरक्षणासाठीचा सग्यासोयऱ्यांचा अध्यादेश सर्वपक्षीय बैठक झाल्याशिवाय काढणार नाही. तसंच खोटी कुणबी प्रमाणपत्रं देणारे आणि घेणारे या दोघांवरही कारवाई करण्याचं आश्वासन सरकारनं दिलं आहे. त्यामुळं उपोषण मागे घेत असल्याची घोषणा ओबीसी आंदोलनकर्ते लक्ष्मण हाके यांनी आज केली.

मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यावं तसंच लोकसभा आणि विधानसभेत ओबीसींना आरक्षण द्यावं, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी उपोषणस्थळी बोलताना केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जातनिहाय जनगणनेला पाठिंबा दिल्याचा दावा भुजबळ यांनी केला.

**<><><><><>**

यु ए पी ए  अर्थात बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंधक कायद्यान्वये स्थापन केलेल्या लवादाने जम्मू काश्मीर मध्ये कार्यरत मुस्लिम लीग जम्मू काश्मीर  आणि आणि तेहेरीक ए हुर्रियत या दोन संघटनांवर केंद्र सरकारनं लादलेली पाच वर्षांची बंदी

योग्य असल्याचं आज म्हटलं आहे. जानेवारी महिन्यात या बंदीचा निर्णय उचित आहे का याची शहानिशा करण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सचिन दत्ता यांच्या एकसदस्यीय लवादाची नियुक्ती केली होती.

<><><><>

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातून इसिस, तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान आणि इतर प्रतिबंधित संघटनांच्या २२ दहशतवाद्यांना अटक केल्याचा दावा पाकिस्तानच्या पोलिसांनी केला आहे. पोलिसांनी पंजाबच्या विविध जिल्ह्यांमध्ये केलेल्या १५२ कारवायांमध्ये या दहशतवाद्यांना अटक केल्याचं लाहोरमधल्या दहशतवाद विरोधी विभागाच्या प्रवक्त्यांनी आज सांगितलं.

<><><><>

भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम, प्रनीत कौर आणि अदिती स्वामी यांनी तुर्कीतल्या अंताल्या इथल्या तिरंदाजी विश्वचषक २०२४ मध्ये कंपाऊंड सांघिक स्पर्धेत सुवर्णपदके जिंकली आहेत. भारतीय महिला संघाने या मोसमातली तीनही विश्वचषक स्पर्धेतली कंपाउंड सांघिक सुवर्णपदके जिंकली आहेत.

<><><><>

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून पहिल्यांदा क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय बांगलादेशनं घेतला आहे. बार्बाडोसमधल्या अँटीग्वामध्ये हा सामना सुरू आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ३ षटकात बिनबाद २९ धावा झाल्या होत्या.

//<><><><>//